# भूगोल विभाग अहवाल

लोक महाविद्यालयात भूगोल हा विषय २००६-०७ या शैक्षणिक सत्रात अभ्यसाला जातो. भूगोल या विषयाचे व्यवहारीक महत्व लक्षात घेता हा विषय विद्यापीठ स्तरावर शिकवीला जातो. भूगोल हा विषय अनेक स्पर्धात्मक परिक्षेकरीता जसे यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. करीत अत्यंत महत्वपूर्ण आहे. तसेच आपण ज्या वातावरणात राहतो त्याच्या बद्दलचे कुतुहम नेहमीच आपल्याला राहीले आहे. पृथ्वीची निर्मीती, वातावरण, जलावरण, तापमानात होणारी वाढ, घटते पर्जन्य, लोकसंख्या वाढ, प्रदुषण अशा अनेक बाबी आपल्या रोजच्या जीवनात पाहायला मिळतात. त्याच अनुषंगाने हा विषय पदवी /बी.ए. च्या अभ्यासक्रमात अत्यंत महत्वपूर्ण आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या अभ्यासक्रमानुसार सत्र २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात बी.ए. भाग १ ला भूरुपशास्त्र, बी.ए. भाग २ ला हवामानशास्त्र तर बी. ए. भाग ३ ला भारताचा भूगोल ह्या विषयाचे अक्ष्यापन करण्यात आले. भूगोल विषया अंतर्गत भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. भूगोल अभ्यास मंडळाचे अक्ष्यक्ष आकाश दुर्गे व सचिव मयुर झाडे यांची नेमनुक कअण्यात आली. सदर बैठकीला विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना मा. सौ. पुष्पा तायडे प्राचार्या. लोक महाविद्यालय, वर्धा यांनी मार्गदर्शन केले.

दि. १४ जानेवारी हा दिवस भूगोल दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यात विर्द्यार्थ्यांना भावी जीवनत भूगोल विषय कसा उपयोगाचा आहे या बाबतीत मार्गदर्शक करण्यात आले. वेगवेगळ्या स्पर्धा परिक्षेत कोणकोणते विषय कसे हाताळायचे व भूगोलाचा त्यात किती मोलाचा हिंस्सा असतो त्या अनुषंगाने प्रमुख पाहूने म्हणून उपस्थित मा. अतुल वानखेडे, शिक्षण विभाग, परतवाडा यांनी मार्गदर्शन केले.

अभ्यासक्रमाचा भाग म्हणून बी.ए. भाग ३ च्या विद्यार्थ्यांना गावाचा सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करावयाचा असतो त्याअनुषंगाने आम्ही पालोती या गावाची निवड केली. दि. २८ जानेवारी २०१६ ला पालोती या गावाला विद्यार्थ्यांना नेऊन तेथील ५० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले व त्यात गावातील लोकसंख्या, जात, व्यवसाय, बाजारपेठ, आरोग्य या विविध विषयाची माहिती घेण्यात आली व त्यानुसार एक अहवाल तयार केल्या गेला.

वरिल सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे, लो.शि.प्र.मंडख चे मा. अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

प्रा. पंकज दि. गोरडे

भूगोल विभाग प्रमुख

लोक महाविद्यालय, वर्धा